**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ०९/२०१२ मधील निशाणी १३२ खालील आदेश.</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीस परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

**<u>वादीचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–</u>**

२. वादीने सदरचा दावा प्रतिवादी यांच्या विरुध्द वाटपासाठी व जाहीर ठराव मिळणेकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. २३ गणेश अशोक यादव यांनी दिनांक २३/१२/२०२५ रोजी क. ग. नं. ५४७/अ पैकी ०१.६० आर इतके क्षेत्र अनिल सर्जेराव पवार यांना खरदी दिले असल्यामुळे सदरील खरेदीदार यांना आवश्यक पक्षकार करणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जात नमूद केलेप्रमाणे त्यांना प्रतिवादी क्र. २६ म्हणून दाखल करुन घेवून व अर्जात नमूद कलम ७–अ दाव्यात सामील करणे आवश्यक आहे. सबब, सदर नावामध्ये दुरूस्ती करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज खोटा व चूकीचा असून तो प्रतिवादीस मान्य नाही. अर्जामध्ये मागितलेली दुरूस्ती ही पूर्णपणे विसंगत आहे. सदर दुरस्तीने दाव्याचे स्वरुप पूर्णपणे बदलत आहे. वादीने मागणी केलेली दुरूस्ती ही परस्पर विरोधी आहेत. तसेच वादीचे दावा दुरूस्तीचे कारण हे बरोबर नाही. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे. तसेच मंजूर करणेचा झालेस जास्तीच्या खर्चाच्या रकमेसह मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. वरीलप्रमाणे वादी चा अर्ज त्यावरील प्रतिवादीचे म्हणणे व इतर कागदपत्रे पाहिले, वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीने मागितलेली दुरूस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असून दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी अत्यंत महत्वाची आहे कारण सदर दावा हा वाटपाकरीता व जाहीर ठरावकरीता असून प्रस्तावित दुरूस्ती ही दाव्यामध्ये गुंतलेल्या सर्व प्रश्नांचा परिणामकारकरित्या अधिनिर्णय करण्यासाठी आवश्यक

वाटते. प्रस्तावीत दुरुस्तीला परवानगी दिली नाहीतर वादीचे व प्रतिवादीचे अपरीमीत नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

## आदेश

१. अर्ज (नि. १३२ ) खर्चासहीत मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रुपये २००/– इतकी दयावी. खर्चाच्या रकमेची पुर्तता केल्यानंतर दावा दुरुस्तीची परवानगी त्यांना देण्यात यावी.

३. वादी यांनी सदर दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करावी व तशी प्रत अभिलेखावर दाखल करावी.

कोरेगाव **( चंद्रशिला. एस. पाटील)**

दि.०४/०५/२०२६ दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.